दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१३४१, २५६०१२०३
२५६०१२१८, २५६९६०६१
२५६९००६२, २५६९००६०
२५६९७२३२

# पुणे विद्यापीठ

*परीक्षा विभाग*
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in

## परीक्षा परिपत्रक क्रमांक : ३७८

परीक्षा आयोजनाच्या कार्यपध्दतीचा आढावा घेण्यात आला असून परीक्षा केंद्रात परीक्षा गैरप्रकार आढळल्यास तसेच परीक्षा शिस्तबध्द व निकोप वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, सर्व संबंधितांना पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१ प्रत्येक महाविद्यालयाने प्राचार्यांमार्फत त्यांच्या महाविद्यालयात कार्यरत असलेले वरिष्ठ प्राध्यापकांचे अंतर्गत दक्षता पथकाची प्रत्येक सत्राच्या (सेशनच्या) वेळी नियुक्ती करावी. सदर पथकामध्ये महिला सदस्य असणे आवश्यक आहे. तसेच ते महाविद्यालयाचे अंतर्गत दक्षता पथक असल्यामुळे याबाबत कोणत्याही प्रकारचे मानधन देण्यात येऊ नये.

२ परीक्षेच्या दिवशी संबंधित महाविद्यालयातील ज्या ब्लॉकमध्ये परीक्षा चालू असताना, ब्लॉकच्या विद्यार्थी संख्येच्या १५% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी परीक्षेत गैरप्रकार केल्याचे आढळल्यास, त्या ब्लॉकमधील संबंधित कनिष्ठ पर्यवेक्षक व त्या सेशनमध्ये कार्यरत असलेल्या अंतर्गत व बहि:स्थ वरीष्ठ पर्यवेक्षकांना त्या दिवसाचे मानधन देण्यात येऊ नये.

३ परीक्षेच्या दिवशी संबंधित महाविद्यालयात परीक्षा चालू असताना एकूण विद्यार्थी संख्येच्या १५% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी परीक्षेत गैरप्रकार केल्याचे आढळल्यास परीक्षा केंद्रावर कार्यरत असलेले सर्व संबंधित कनिष्ठ पर्यवेक्षक, अंतर्गत व बहि:स्थ पर्यवेक्षक आणि प्राचार्य यांना त्या दिवसाचे मानधन देण्यात येऊ नये.

तसेच विद्यापीठाच्या परीक्षेला प्रश्नपत्रिका तयार करणारे प्राश्निक (Paper Setters), उत्तरपत्रिका तपासण्यासाठी परीक्षक (Examiners), नियामक (Moderator) व पर्यवेक्षक यांचे कोणते नातेवाईक परीक्षेला बसले असता परीक्षेचे कोणते काम संबंधितांनी करावे व कोणते काम करु नये यासंबंधी पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. प्राश्निक (Paper Setters), परीक्षक, नियामक (Moderator) व पर्यवेक्षक यांना त्याचे नातेवाईक त्यांच्या विद्याशाखेत पदवी परीक्षेला बसला असेल तर त्यांना पदवी परीक्षेचे काम करण्यास अनुमती नसून त्यांना पदव्युत्तर परीक्षेचे काम करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

२. तसेच त्यांचे नातेवाईक त्यांच्या विद्याशाखेत पदव्युत्तर परीक्षेला बसला असेल तर त्यांना पदव्युत्तर परीक्षेचे काम करण्यास अनुमती नसून त्यांना पदवी परीक्षेचे काम करण्यास अनुमती देण्यात येत आहे. "नातेवाईक" या संज्ञेत खालील नातेवाईकांचा समावेश करण्यात येत आहे.

"Father,mother,wife,husband,son,daughter,daughter in law, brother, sister, first cousine and its children."

वरील निर्णयाची अंमलबजावणी ऑक्टोबर/नोव्हेंबर २००९ च्या परीक्षा सत्रापासून करण्यात यावी.

संदर्भ : परीक्षा-समन्वय/१६०९
दिनांक: २३.११.२००९

(डॉ. शि.मो. आहिरे)
प्रभारी परीक्षा नियंत्रक